MHST060008812024

**किरकोळ फौजदारी क्रमांक ६४/२०२४**

**निशाणी क्रमांक ०१ खाली आदेश पारित**

(विजय शंकर सत्रे विरुद्ध प्रदिप नाना सत्रे)

अर्जदाराचे प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने भारतीय दंड सहिता कलम ४२६, ४४९, ५०६, १४३, १४७, १४८, १४९ प्रमाणे प्रस्तावित आरोपीविरूध्द दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, मौजे सत्रेवाडी, ता. माण, जि. सातारा येथे त्यांची शेती व घर आहे. सन २००६ साली नाना जयसिंग सत्रे हे सत्रेवाडी येथे आले व त्यांची आई आजारी असल्याकारणाने त्यांना पैश्याची गरज होती म्हणून त्यांनी मौजे सत्रेवाडी येथील गट नं. ४७ मधील १ आर हिस्सा तोंडी खरेदीने रूपये ६,०००/- मोबदला घेऊन त्यांना दिला होता. सदर जागा अर्जदाराने एक वर्ष वापरली. सदर जागेच्या व्यवहाराबाबत त्यांच्यासोबत कोणताही दस्त केला नव्हता. सदर जागेवर अर्जदाराने घराचे बांधकाम केल्यावर आरोपीच्या चुलत्याने हरकत अडथळा केला. त्यानंतर आरोपीच्या वडिलांनी रूपये १००/- च्या स्टॅम्पवर रस्त्याबाबत हरकत आली तर मी दुर करेन तुम्ही घराचे बांधकाम करून घ्या असे लिहून दिले. त्यानंतर अर्जदाराने घराचे बांधकाम पूर्ण केले तोपर्यंत त्यांनी हरकत अडथळा केला नाही. बांधकाम पूर्ण झाल्यानंतर अर्जदाराने ग्रामपंचायतीत नोंद करून सन २००८ ते २०२३ पर्यंत घरपट्टी भरली. तोपर्यंत आरोपीने हरकत अडथळा केला नाही. सदरचे घर अर्जदार व त्यांचे वडील शेतीचे साहित्य ठेवणेसाठी वापरत आहे.

३. अर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की, नाना जयसिंग सत्रे यांचा

मुलगा आरोपी प्रदिप नाना सत्रे याने दिनांक १२.०५.२०२४ रोजी इतर अनोळखी सहा इसमांना घेऊन दोन चारचाकी वाहनातून आले व सदरचे घर पाडण्यात सुरूवात केली. ही बाब माझ्या चुलत भावाने अर्जदाराच्या भावाला फोनवरून सांगितली व अर्जदाराच्या भावाने त्यांना फोनवरून सदरची बाब सांगितली. घर पाडत असताना अर्जदाराचे भाऊ भाऊसो सत्रे, भावजय सविता सत्रे व वडिल शंकर सत्रे आरोपींना थांबवण्यास गेले असता आरोपी त्यांच्या अंगावर धावून गेले.

४. अर्जदाराने पुढे असेही कथन केले की, त्यानंतर अर्जदाराच्या भावाने दहिवडी पोलीस स्टेशनला ऑनलाईन तक्रार दाखल केल्यावर घटनेच्या दिवशी पोलीस घटनास्थळी पोहोचले व आरोपी व इतर इसमांना घेऊन गेले. पोलिसांनी आरोपीविरूध्द काही कारवाई केली नाही म्हणुन अर्जदाराने जिल्हा पोलीस प्रमुख यांच्याकडे लेखी तक्रार पोष्टाने पाठवली. तरीही कोणतीही कारवाई झाली नाही. म्हणून अर्जदाराने आरोपीविरूध्द न्यायालयात भारतीय दंड सहिता कलम ४२६, ४४९, ५०६, १४३, १४७, १४८, १४९ प्रमाणे तक्रार दाखल करून आरोपींविरूध्द कारवाई व्हावी अशी विनंती केली आहे.

५. अर्जदाराचे भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम २२३ अन्वये अर्जदार/फिर्यादीचे सत्यापन नोंदवण्यात आले. त्यानंतर गैरअर्जदार यांना म्हणणे दाखल करण्याची संधी देण्याकरीता नोटीस देण्यात आली. त्याप्रमाणे गैरअर्जदार हजर झाले. गैरअर्जदार यांनी निशाणी ०६ अन्वये म्हणणे दाखल केले.

६. सदरच्या प्रकरणात युक्तिवाद करण्यासाठी अर्जदार व त्यांचे वकील आज रोजी न्यायालयात हजर होते. गैरअर्जदार न्यायालयात हजर होते. गैरअर्जदाराचे वकील हजर राहिले नाहीत. अर्जदाराच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकला. सदर प्रकरणातील अर्जदाराचे सत्यापन, दाखल कागदपत्रे गैरअर्जदारांनी दाखल केलेले म्हणणे यांचे अवलोकन केले.

७. अर्जातील कथन व शपथेवरील जबाब यांचा विचार करता, प्रथमदर्शनी प्रस्तावित आरोपीने अर्जदाराच्या ताब्यातील मालमत्तेचे नुकसान केल्याचा आरोप

असल्याने भारतीय दंड संहिता कलम ४२६ या गुन्ह्याचे आवश्यक घटक दिसून येतात. त्याचप्रमाणे अर्जदाराच्या ताब्यातील घरात अनधिकृतपणे प्रवेश करून नुकसान केल्याचा आरोप असल्याने प्रथमदर्शनी कलम ४४९ या गुन्ह्याचे घटकही उघड होतात. या टप्प्यावर न्यायालयास पुराव्याचे सखोल मूल्यमापन करावयाचे नसून, प्रक्रिया जारी करण्याइतपत प्रथमदर्शनी आधार आहे किंवा नाही, एवढाच विचार करावयाचा असतो. उपलब्ध मजकूर व जबाबावरून वरील दोन कलमांबाबत प्रक्रिया जारी करण्यासाठी पुरेसा आधार असल्याचे दिसून येते.

८. परंतू, कलम भारतीय दंड संहिता कलम ५०६, १४३, १४७, १४८ व १४९ संदर्भात अर्जामध्ये बेकायदेशीर जमावाचे समान उद्दिष्ट (common object), दंगल (rioting), प्राणघातक शस्त्रांचा वापर अथवा प्रत्येक व्यक्तीची विशिष्ट भूमिका याबाबत आवश्यक व ठोस स्वरूपाचे आरोप आढळून येत नाहीत. केवळ आरोपी इतर काही व्यक्तींना सोबत घेऊन आला, एवढ्या कथनावरून वरील कलमांचे आवश्यक घटक प्रथमदर्शनी सिद्ध होतात असे म्हणता येत नाही. त्यामुळे या कलमांबाबत प्रक्रिया जारी करण्यासाठी आवश्यक असा पुरेसा आधार उपलब्ध नाही. सबब, प्रस्तावित आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम ४२६ व ४४९ अंतर्गत प्रथमदर्शनी कारण दिसून येत असल्यामुळे मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## <u>आदेश</u>

१. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम २२७ अन्वये प्रस्तावित आरोपी विरुद्ध भारतीय दंड सहिता कलम ४२६ व ४४९, (भारतीय न्याय संहिता कलम ३२४(२) व ३३२ (a)) अन्वये आदेशिका जारी करण्यात यावी.

२. संबंधितांनी सदरचे प्रकरण नियमित फौजदारी खटला म्हणून नोंदवावा.

सही/-

(ए. वाय. शेख)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, दहिवडी.

दहिवडी
दिनांक: ०४/०७/२०२६